# "नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे"

## या संस्थेचे विधानपत्र.(नविन)

संस्थेचे नाव :- "नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे"

संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :- घर नं. ७९४, चिंचघर, पो. कुडूस, तालुका भिवंडी, जि. ठाणे

संस्थेचे ध्येय व उद्देश :-

अ. सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक आणि नैसर्गिक उन्नतीसाठी कार्य करणे त्या साठी व्याख्याने, सभा, संमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम, संस्कार शिबीरे व सण इत्यादी साजरे करणे.

मराठी, इंग्रजी, हिंदी व इतर सर्व भाषांमध्ये अंगणवाडी, बालवाडी, पुर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा, पुर्वव्यावसाईक, व्यावसाईक क्रमशाळा, तांत्रिक शाळा सुरु करणे तसेच उच्च शिक्षणासाठी ज्युनिअर व सिनीअर महाविद्यालये, पदवी व वदवीत्तर महाविद्यालये, डिग्री कॉलेज, डिअेड व बिअेड कॉलेजेस इत्यादी सर्व प्रकारच्या संस्था सुरु करणे व ते चालविणे.

ज. वैद्यकिय, अभियांत्रिकी, तांत्रिकी, ललीत कला, शारिरीक शिक्षण इत्यादी प्रकारच्या संस्था चालु करणे व त्या चालविणे.

च. समाजासाठी मंगलकार्यालय बांधणे, वाचनालये, पुस्तकालय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे, वाचन वर्ग, वृधाश्रम शाळा, गृहप्रशिक्षण कार्यक्रम, इत्यादी सुरु करणे व ते चालविणे तसेच या व्यतीरीक्त जात, धर्म, किंवा राष्ट्रीयत्वाच्या कोणत्याही श्रेणी अथवा प्रमाणाशिवाय स्थापण होणा-या वरील सर्व संस्था चालविण्यासाठी लागणारे कोणत्याही प्रकारचे अथवा स्वरुपाचे सर्व शैक्षणिक कार्य करणे आणि गरजू व योग्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे, तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देणे.

छ. सर्व त-हेच्या खेळांचे शिक्षण देणे, खेळाच्यां स्पर्धा भरविणे इतर क्रिडा संस्थेच्या स्पर्धेत भाग घेणे. होतकरु खेळाडूना सर्व प्रकारची मदत करणे, व्यायामशाळा, कार्यालय निर्माण करणे व ते चा चालविणे.

प्रमाणीत करणेत येते की, नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे या संस्थेच्या विधानपत्राची सत्य प्रत आहे.

| अ. न. | पदाधिका-याचे नाव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १. | श्री. मुस्तुफा अहमद मेमन | अध्यक्ष | |
| २. | श्रीमती रुक्साना मुक्तार मोमीन | संचिव | |
| ३. | श्री. पांडूरंग चांगो पाटील | खजिनदार | |

# "नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे"
# या संस्थेचे नियम आाणि नियमावली.(नविन)

१. **नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या :-**

अ. **संस्था :-** संस्था म्हणजे घर नं. ७९४, चिंचघर, पो. कुडूस, तालुका भिवंडी, जि. ठाण येथील "नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे".

ब. **कार्यकारी मंडळ :-** कार्यकारी मंडळ म्हणजे "नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे" या संस्थेचे कार्यकारी मंडळ.

क. **अधिनियम :-** अधिनियम म्हणजे "संस्था नोंदणी अधिनियम, १८६०"

ड. **सभासद :-** सभासद म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक ४ प्रमाणे निवडलेला सभासद होय.

इ. **सभा :-** सभा म्हणजे "निॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे" या संस्थेच्या सभा.

२. **कार्यक्षेत्र :-** "नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे" या संस्थेचे कार्यक्षेत्र पूर्ण देशभरात राहिल. वाडा तालुक्यात या नावांची दुसरी कोणतीही संस्था अस्तित्वात नाही.

३. **हिशोबाचे वर्ष :-** या संस्थेचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च याप्रमाणे राहील.

४. **सभासदत्व व नोंदणीची पध्दत :-**

अ. संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणरी व्यक्ती जीचे वय १८ सषपिक्ष कमी नाही व जिला संस्थेचे उद्देश व नियमावली मान्य आहे असा संस्थेचा सभासद होण्यास पात्र राहील.

ब. सभासत्वासाठी अशा व्यक्तीने संस्थेच्या सचिवांकडे लेखी अर्ज करणे आवश्यक राहील.

क. सभासदत्वासाठी प्राप्त झालेले अर्ज कार्यकारी मंडळाच्या मिटींगमध्ये निर्णयासाठी ठेवण्यात येइल. सभासद होऊ इच्छिणा-या व्यक्तींना सभासद करुन घ्यावे किंवा नये या बाबतचा निर्णय कार्यकारी मंडळाच्या मिटींगमध्ये घेऊन संबंधीत व्यक्तीस लेखी कळविण्यात येईल.

अशा व्यक्तीने या संस्थेच्या सचिवांकडे सुचना प्राप्त झाल्याचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आंत आपली सभासद फी जमा करणे अनिवार्य राहील.

ड. वरील नियम ४-क प्रमाणे सभासद फि मिळाल्यानंतर संबंधीत व्यक्तीचे नावाची नोंद सभासद नोंदणी वहिमध्ये मरण्यात येईल संस्था नोंदणी अधिनियम ११८६० चे कलम १५ संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधिल नियम १५ नुसार सभासद नोंदवही अनुसूची सहा या विहीत नमुण्यांत ठेवण्यात येईल. सभासद नोंदवहीचा विहीत नमुना या साबतच्या जोडप, एक प्रमाणे आहे.

इ. या संस्थेचे सभासद होऊ इच्छिणां-यास प्रवेश फी रुपये ५०१/- सामान्य सभासद वार्षिक वर्गाणी रुपये २१०००/- व आजिवन सभासद फी ५१०००/-रुपये राहील.

५. **सभासदाचे प्रकार :-**

या संस्थेत १) सामान्य सभासद २) आजीवन सभासद प्रकारचे ( लाईफ मेंबर्स ) सभासद राहतील.

६. **सभासदत्व रद्द होणे बाबत :-**

जो सभासद (कार्यकारी मंडळावरील सभासद) पाच सभांना सतत गैरहजर राहील त्याचे सभसदत्व रद्द होईल. सभासदाच्या निधनामूळे, सभासद शारिरीक व मानसिक दृष्टया अपंग झाल्यास तसेच जो सभासद संस्थेविरुध्द कारवाया करील अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करता येईल. जर एखाद्या सभासदाने संस्थेच्या निधीची अफरातफर केल्यास त्याचे सभासदत्व रद्द करता येईल याचा अधिकार कार्यकारी संस्थेकडे राहील.

७. **संस्थेची सर्वसाधारण सभा तिचे अधिकार आणि कार्ये :-**

संस्थेची सर्वसाधारण सभा हिशोबाचे वर्ष संपल्या पासून सहा महिन्याच्या आत घेतली जाईल. या सभेच्या नोटीसा सर्व सभासदांना सभेच्या १४ दिवस आधी मिळतील अशा तरेने पाठविण्याची जबाबदारी चिटणिस यांची राहील. या सर्वसाधारण सभेचे अधिकार व कार्ये खालील प्रमाणे राहतील.

अ. मागील सभेचा संपूर्ण वृतांत वाचून त्यास मंजूरी देणे.

ब. संस्थेच्या जमाखर्चावर उहापोह करुन त्यास मंजूरी देणे.

क. अदांज पत्रकांवर सखोल चर्चा व विचार विनिमय करुन त्यास मंजूरी देणे.

ड. चार्टर्ड अकौटंट, अंतर्गत हिशोबनीस, न्यायविषयक सल्लागार व इतर स्टाफ (कर्मचारी वर्ग) यांची नेमणूक करणे.

इ. कार्यकारिणीच्या पदाधिकारी व सभासद यांची निवड करणे

फ. ऐनवेळी येणा-या विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणे.

८. **सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :-**

सर्वसाधारण सभेच्या सूचना सर्व सभासदांना १४ दिवस अगोदर मिळतील अशा प्रकारे पाठविण्याची जबाबदारी सचिव यांची राहील. या सभेची गणसंख्या एकंदर सभासदांच्या तीन पंचमांश या प्रमाणे राहील. गण संख्ये अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. व अशा स्थगित झालेल्या सभेला नंतर गण संख्येची आवश्यकता राहणार नाही. सभेची सुचना सभासदांना हस्ते किंवा रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात येईल व पोहच म्हणून त्यांची सही घेण्यात येईल.

९. **विशेष सर्वसाधारण सभा व कार्ये :-**

वार्षिक सर्वसाधारण सभेशिवाय एखाद्या विषयावर विचार विनिमय व निर्णयासाठी अशी सभा बोलाविता येईल. अशा सभेची सूचना चार दिवस अगोदर सभासदांना पाठविण्याची जबाबदारी सचिव किंवा अध्यक्ष यांची राहील. व सभा ज्या विषयांबर विचारविनिमय व निर्णयासाठी बोलाविली जाईल त्याच विषयांवर विचार होईल. सभेची गणसंख्या सर्वसाधारण सभेप्रमाणे राहील. व गणसंख्येअभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल.

१०. **कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व रचना :-**

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तहहयात अध्यक्ष राहतील. मात्र त्यांचे स्वेच्छेन ते राजीनामा देऊ शकतील व त्याजागी स्वतःच्या अधिकारात नवीन अध्यक्षांची निवड करु शकतील मात्र सदर व्यक्ती हा संस्थेचा आजीवन सभासद असावा. संस्थापक अध्यक्ष सोडून राहीलेल्या कार्यकारीणीची निवड वार्षीक सर्वसाधारण सभेत होईल. निवडणूक प्रक्रियेत फक्त आजीव सभासद भाग घेवू शकतील म्हणजेच निवडणूकीसाठी उभे रहाणे तसेच निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार फक्त आजीव सभासदांना राहील.

Scanned with CamScanner

या संस्थेचे कार्यकारी मंडळ कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ सभासदांचे राहील. सदर कार्यकारी मंडळावर पाच पदाधिकारी राहतील व कार्यकारी मंडळाची रचना १ अध्यक्ष, १ उपाध्यक्ष, १ सचिव, १ सहसचिव , १ खजिनदार व इतर दहा सभासद या प्रमाणे राहील.

**११. कार्यकारी मंडळाच्या कार्यकाळ व निवडणुकीची पध्दत :-**

अ. या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षाचा राहील व नंतर दर पाच वर्षानी संस्थापक अध्यक्ष सोडून सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची व सभासद यांची निवड करण्यांत येईल. संस्थापक अध्यक्ष कायम स्वरुपी अध्यक्ष राहील.

ब. सदर कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची व सभासद यांची निवड करण्यांसाठी मतदानाचा अधिकार फक्त आजिव सभासदांना राहील. निवडणुकीची पध्दत गुप्त मतदान पध्दतीने राहील.

**१२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-**

अ. संस्थेच्या नियमावली प्रमाणे सभेचे आयोजन करणे,
ब. कार्यासाठी निधी, देणग्या जमविणे,
क. आवश्यकतेप्रमाणे समित्या, उपसमित्या व सल्लागार नेमणे,
ड. नोकर वर्गाची नेमणूक करणे,
इ. उद्देश पुर्तीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे,
फ. नियमाचे पालन करणे,
प. ध्येयधोरणांसी विसंगत वागणुक असल्यास कारवाई करणे.

**१३. कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीची सभा :-**

कार्यकारी मंडळाच्या सभा वर्षातून कमीतकमी चार होतील. सभेच्या नोटीसा सभेच्या सात दिवस अगोदर पाठविण्याची जबाबदारी सचिव यांची राहील.

मागणीची सभा :- कोणत्याही सदस्यानी ज्यांची संख्या पाच पेक्षा कमी नसेल अशा सदस्यानी सभेची मागणी केल्यास अशा प्रकारची मागणी सभा कार्यकारी मंडळाला बोलविता येईल. अशा सभेची नोटीस चार दिवस अगोदर पाठविली जाईल व अशी सभा सचिव किंवा अध्यक्ष यांच्या सहीने बोलविली जाईल. तसेच ज्या विषयाची मागणी झालेली असेल अशाच विषयांवर विचार विनीमय त्या सभेमध्ये होईल.

**१४. कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-**

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना सात दिवस अगोदर पाठविण्याची जबाबदारी सचिव यांची राहील. सदर सभेसाठी गणसंख्या कार्यकारी मंडळाच्या एकंदर सभासदांच्या तीन पंचमांश जास्त याप्रमाणे राहील. गणसंख्येअभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवसी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल. अशाप्रकारे स्थगित झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. सभेची नोटीस सभासदांना हस्ते किंवा रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात येईल व पोहोच म्हणूस सही घेणेत येईल.

**१५. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :-**

अ. कार्यकारी मंडळाची निवडणूक संस्थापक अध्यक्ष हा कायम स्वरुपी अध्यक्ष असलेने अध्यक्ष पद सोडून बाकीच्या सर्व पदांसाठी दर पाच वर्षानी सर्वसाधारण सभेत होईल. उमेदवार म्हणून उभे राहण्याचा किंवा मतदान करण्याचा अधिकार फक्त आजीव सभासदांना राहील.

ब. निवडणूकीची पध्दत गुप्त मतदान पध्दती राहील.

Scanned with CamScanner

१६. **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणे बाबत :-**

कार्यकारी मंडळातील एखाद्या विश्वस्ताची जागा मृत्यू, राजीनामा अगर अन्य काही कारणामूळे रिकामी झाल्यास ती जागा राहिलेल्या मुदतीसाठी राहीलेले कार्यकारी मंडळाचे सभासद स्वतःच्या अधिकारांत भरु शकतील.

१७. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :-**

अ. **अध्यक्ष :-** सभेचे कामकाज चालविणे, संस्थेच्या हितसंबधाचे योग्य ते आदेश देणे, संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे, पदाधिकारी यांच्या कामकाजांवर देखरेख ठेवणे, वेळोवेळी इतर पदाधिकारी यांना व सदस्यांना योग्य आदेश देणे, समसमान मते झाल्यांस स्वतः निर्णायक मत देणे, स्वतःच्या अधिकारांत सभा बोलविणे, निवडणूकीचे कामकाज पाहणे.

ब. **उपाध्यक्ष :-** अध्यक्षांच्या अनुपस्थितीत त्यांची वरील सर्व प्रकारची कामे जबाबदारीने पार पाडणे.

क. **सचिव :-**

१. सर्व प्रकारच्या सभांच्या नोटीसा काढणे.
२. संस्थेचा सर्व व्यवहार करणे.
३. सभांचे मिनीट बूक लिहीणे.
४. आलेल्या तक्रारींचे निवारण करणे.
५. सभांचा अहवाल तयार करणे.
६. संस्थेची मालमत्ता सांभाळणे.
७. आवश्यक तो पत्रव्यवहार अध्यक्षांच्या सहीने करणे.
८. नोकर वर्गावर व इतर सदस्यांवर देखरेख करणे.
९. संस्थेच्या हिताच्या दृष्टीने सर्व कामे करणे.
१०. सभासद नोंदवही ठेवणे.

ड. **सह-सचिव :-** सचिवांच्या अनुपस्थितीत त्यांची वरील सर्व प्रकारची कामे जबाबदारीने पार पाडणे.

इ. **खजिनदार :-**

१. संस्थेचा हिशोब लिहीणे.
२. वर्गणी येणे असलेल्यांची वेळोवेळी यादी कार्यकारी मंडळास सादर करणे.
३. आर्थिक व्यवहार सांभाळणे.
४. देवाण घेवाण करणे.
५ हिशोब पत्रके तयार करुन मंजूरी साठी सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेसाठी ठेवणे.

ई. **सभासद :-** संस्थेच्या कामकाजात मदत करणे.

१८. **संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :-**

अ. सभासदांकडून आलेली वर्गणी, देणग्या व इतर कायदेशीर मार्गांनी मिळणारा पैसा याला संस्थेचा निधी समजला जाईल.

ब. शासन व इतर व्यक्तीनी ज्या स्थावर मिळकती संस्थेला कोणत्याही रुपाने दिल्यास व संस्थेने स्वतःच्या निधीतून ज्या स्थावर व जंगम मिळकती संपादित केल्या असतील त्याचे रजिस्टर ठेवण्यात येईल. व त्या मिळकती संस्थेच्या मालकीच्या आहेत असे गृहित धरण्यांत येईल.

क. संस्थेचा निधी व मिळकत यांचा विनियोग संस्थेच्या ध्येयधोरणांच्या व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी करण्यांत येईल.

Scanned with CamScanner

१९. **उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद (टक्केवारी) :-**

संस्थेचे मूख्य उद्दिष्टये सामाजिक, वैद्यकिय, शैक्षणिक व इतर आहेत म्हणून संस्थेचे सर्व खर्च वरील उद्दिष्टांवर होतील.

२०. **कर्ज किंवा ठेवी या संबंधीची तरतूद :-**

संस्थेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी लागणारा निधी जर कमी पडत असल्यांस संस्था कर्ज काढू शकेल अशा वेळी प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार योग्य अधिका-यांकडून पूर्व परवाणगी घेवून असे कर्ज काढता येईल. त्याच प्रमाणे संस्थेचा निधी गरज भागल्या नंतर उर्वरित रक्कम प्रचलित कायद्याच्या तरतूदीं नुसार योग्य अधिका-यांच्या पूर्व परवानगीने योग्य ठिकाणी गुंतविण्याते येईल. त्या साठी चॅरिटी कमीश्नर, मुंबई यांची पुर्वपरवानगी घेतली जाईल.

२१. **स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करण्यासंबंधीची तरतूद :-**

स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळाला राहतील. अशा खरेदी खतावर सहया करण्याचे अधिकार अध्यक्ष यांना देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे संस्थेच्या माहितीची स्थावर मालमत्ता विकण्याचे वेळी प्रचलित कायद्याच्या तरतूदी प्रमाणे योग्य त्या अधिका-यांनी पूर्वपरवानगी घेवूनच विकता येईल. त्या साठी चॅरिटी कमीश्नर, मुंबई यांची पुर्वपरवानगी घेतली जाईल.

२२. **बँक खाते व पैशाचे व्यवहार :-**

संस्थेचे बँक खाते कोणत्याही बँकेत उघडता येईल व संस्थेचे आर्थिक व्यवहार व बँकेचे व्यवहार अध्यक्ष, ,महासचिव व खजिनदार यांच्या पैकी कोणाही दोघांच्या सहीने चालतील. खजिनदार यांना संस्थेच्या खर्चासाठी हाती जास्तीत जास्त रुपये एक हजार पर्यंत ठेवता येतील. जास्त रकमेची आवश्यकता असल्यांस कार्यकारी मंडळाची मान्यता घ्यावी लागेल. बँकेचे व्यवहार हे फक्त संस्थेच्या कामासाठीच होतील.

२३. **सभासद रजिस्टर :-**

सभासदांची नोंद असलेली रजिस्टर संस्था तयार करील. सदर रजिस्टर "संस्था नोंदणी अधिनियम १८६०" अंतर्गत नियम १९७१ च्या अनुसूचित १, २ व ६ अन्वये ठेवण्यात येईल.

२४. **नियम व नियमावलीतील बदल किवां वाढ, दुरुस्ती करणेबाबत :-**

या संस्थेच्या नियम व नियमावलीतील बदल, वाढ अथवा दुरुस्ती करावयाची झाल्यास या बाबत सभासदांना कमीत कमी ३० दिवस अशी सूचना देवून कळविण्यात येईल. याबाबतचा सर्वसाधारण सभेत हजर सभासदांच्या ३/५ मतांनी ठराव करण्यांत येईल. अशा प्रकारे हा ठराव मंजूर झाला तर पून्हा एक महिन्याची विशेष सर्वसाधारण सभा बोलावून हा ठराव त्या सभेत संमत करण्यांत येईल. या बाबत संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १२ प्रमाणे कारवाही होईल.

२५. **संस्थेच्या नावांत व उद्देशात बदल करणेबाबत :-**

संस्थेच्या नावांत अथवा उद्देशात बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १२ व १२ अ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

Scanned with CamScanner

२६| संस्थेच्या विसर्जनाबाबत :-

जर काही कारणास्तव ही संस्था विर्सजन, बरखास्त करावयाची झालीतर वरील प्रमाणे सर्व सभासदांना १० दिवस अगोदर नोटीस देवून कळविण्यात येईल. याबाबत सुध्दा सर्वसाधारण सभेत ३/५ मताने हा ठराव मंजूर करण्यांत येईल. जर अशा प्रकारे ही संस्था विसर्जन, बरखास्त करावयाची झाली तर या संस्थेची स्थावर व जंगम मालमती संस्थेचे उद्देश असलेल्या नोंदणी कायदा १८६० प्रमाणे नोंदविलेल्या संस्थेस देणेची / देण्यात येईल.

प्रमाणीत करणेत येते की, नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे या संस्थेच्या विधानपत्राची सत्य प्रत आहे.

| अ. न. | पदाधिका-याचे नाव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १| | श्री. मुस्तुफा अहमद मेमन | अध्यक्ष | |
| २. | श्रीमती रुक्साना मुक्तार मोमीन | सचिव | |
| ३. | श्री. पांडूरंग चांगो पाटील | खजिनदार | |

"नॅशनल एज्युकेशन सोसायटी, कुडूस जि. ठाणे"
या संस्थेचा बदलाचा तक्ता.

**१) संस्थेच्या कायालयाचा पत्ता :**

**जूनेप्रमाणे** :- द्वारा श्री. खलील अमीरसोब पटेल, घर न. १७५, कुडूस, तालुका वाडा जि. ठाणे

**नविनप्रमाणे** :- द्वारा घर न. ७९४, चिंचघर, पो. कुडूस, तालुका वाडा, जि. ठाणे असा राहील.

**२) संस्थेचे ध्येय व उद्देश** :-

**संस्थेचे जूनेप्रमाणे खालील उद्देश होते :**

अ) भारतीय नागरिकांत बंधुभाव निर्माण करुण त्यांची बौध्दिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रगती करणे आणि सामाजिक समस्या सोडविण्यासाठी सहाय्य करुन त्यायोगे देशाच्या विकासास हातभार लावणे.

ब) वरील उदि्ष्टांच्या पूर्तीसाठी सर्व नागरिक सुशिक्षीत होणे गरजेचे आहे म्हणून शैक्षणिक संस्था स्थापन करुन जसे पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक विद्यालय सुरु करणे व चालविणे.

उच्च शिक्षणासाठी कनिष्ठ महाविद्यालये, पद्वी व पद्वीत्तर महाविद्यालये सुरु करणे व चालविणे ज्यात तंत्र शिक्षण, ललित कला, वैद्यकिय शिक्षण, शारिरीक शिक्षण, इ. गरीब व गरजू विद्यार्थ्यासाठी वस्तीगृहे, आश्रमशाळा, वाचनालये, वाचन वर्ग सुरु करणे व चालविणे, सर्व समाजाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी शासकिय योजना मिळवून त्यांची अंमलबजावणी करुन त्याचा लाभ समाजाला मिळवूण देणे इ.

क) जीवन राहणीमान सुखी समाधानी करुन उत्कर्षासाठी विधायक व इतर समाजोपयोगी कार्य करणे.

**संस्थेचे नविणप्रमाणे खालील उद्देश राहतील :**

अ. सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक आणि नैसर्गिक उन्नतीसाठी कार्य करणे त्या साठी व्याख्याने, सभा, संमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम, संस्कार शिबीरे व सण इत्यादी साजरे करणे.

ब. मराठी, इंग्रजी, हिंदी व इतर सर्व भाषांमध्ये अंगणवाडी, बालवाडी, पुर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा, पुर्वव्यावसाईक, व्यावसाईक क्रमशाळा, तांत्रिक शाळा सुरु करणे तसेच उच्च शिक्षणासाठी ज्युनिअर व सिनीअर महाविद्यालये, पदवी व वदवीत्तर महाविद्यालये, डिग्री कॉलेज, डिअेड व बिअेड कॉलेजेस इत्यादी सर्व प्रकारच्या संस्था सुरु करणे व त्या चालविणे.

ज. वैद्यकिय, अभियांत्रिकी, तांत्रिकी, ललीत कला, शारिरीक शिक्षण इत्यादी प्रकारच्या संस्था चालु करणे व त्या चालविणे.

च. समाजासाठी मंगलकार्यालय बांधणे, वाचनालये, पूस्तकालय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे, वाचन वर्ग, वृधाश्रम शाळा, गृहप्रशिक्षण कार्यक्रम, इत्यादी सुरु करणे व ते चालविणे तसेच या व्यतीरीक्त जात, धर्म, किंवा राष्ट्रीयत्वाच्या कोणत्याही श्रेणी अथवा प्रमाणाशिवाय स्थापण होणा-या वरील सर्व संस्था चालविण्यासाठी लागणारे कोणत्याही प्रकारचे अथवा स्वरुपाचे सर्व शैक्षणिक कार्य करणे आणि गरजू व योग्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे, तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देणे.

छ. सर्व त-हेच्या खेळांचे शिक्षण देणे, खेळाच्यां स्पर्धा भरविणे इतर क्रिडा संस्थेच्या स्पर्धेत भाग घेणे. होतकरु खेळाडूना सर्व प्रकारची मदत करणे, व्यायामशाळा, कार्यालय निर्माण करणे व ते चा चालविणे

Scanned with CamScanner

४. **सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :-**

**जूने प्रमाणे :-**

सर्वसाधारण सभेच्या सूचना सर्व सभासदांना १४ दिवस अगोदर मिळतील अशा प्रकारे पाठविण्याची जबाबदारी सचिव यांची राहील. या सभेची गणसंख्या एकंदर सभासदांच्या एक त्रत्यांश या प्रमाणे राहील. गण संख्ये अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. व अशा स्थगित झालेल्या सभेला नंतर गण संख्येची आवश्यकता राहणार नाही.

**नविन प्रमाणे :-**

सर्वसाधारण सभेच्या सूचना सर्व सभासदांना १४ दिवस अगोदर मिळतील अशा प्रकारे पाठविण्याची जबाबदारी सचिव यांची राहील. या सभेची गणसंख्या एकंदर सभासदांच्या तीन पंचमांश या प्रमाणे राहील. गण संख्ये अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. व अशा स्थगित झालेल्या सभेला नंतर गण संख्येची आवश्यकता राहणार नाही. सभेची सुचना सभासदांना हस्ते किंवा रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात येईल व पोहच म्हणून त्यांची सही घेण्यात येईल.

५. **कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व रचना :-**

**जूने प्रमाणे** :- या संस्थेचे कार्यकारी मंडळ कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ सभासदांचे राहील. सदर कार्यकारी मंडळावर पाच पदाधिकारी राहतील व कार्यकारी मंडळाची रचना १ अध्यक्ष, १ उपाध्यक्ष, १ सचिव, १ सह-सचिव, १ खजिनदार व इतर दहा सभासद या प्रमाणे राहील.

**नवीन प्रमाणे :-**

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तहहयात अध्यक्ष राहतील. मात्र त्यांचे स्वेच्छेन ते राजीनामा देऊ शकतील व त्याजागी स्वत:च्या अधिकारात नवीन अध्यक्षांची निवड करु शकतील मात्र सदर व्यक्ती हा संस्थेचा आजीवन सभासद असावा. संस्थापक अध्यक्ष सोडून राहीलेल्या कार्यकारीणीची निवड वार्षीक सर्वसाधारण सभेत होईल. निवडणूक प्रक्रियेत फक्त आजीव सभासद भाग घेवू शकतील म्हणजेच निवडणूकीसाठी उभे राहण्याचा तसेच निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार फक्त आजीव सभासदांना राहील.

या संस्थेचे कार्यकारी मंडळ कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ सभासदांचे राहील. सदर कार्यकारी मंडळावर पाच पदाधिकारी राहतील व कार्यकारी मंडळाची रचना १ अध्यक्ष, १ उपाध्यक्ष, १ सचिव, १ सहसचिव , १ खजिनदार व इतर दहा सभासद या प्रमाणे राहील.

६. **कार्यकारी मंडळाच्या कार्यकाळ व निवडणुकीची पध्दत :-**

**जूनेप्रमाणे :-**

अ. या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षाचा राहील व नंतर दर पाच वर्षानी सर्वसाधारण कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची व सभासद यांची निवड करण्यांत येईल.

ब. सदर कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची व सभासद यांची निवड करण्यांसाठी मतदानाचा अधिकार फक्त आजीव व हितचिंतक सभासदांना राहील. निवडणुकीची पध्दत गुप्त मतदान पध्दतीने राहील.

Scanned with CamScanner

नवीन प्रमाणे :-

अ. या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षाचा राहील व नंतर दर पाच वर्षांनी संस्थापक अध्यक्ष सोडून सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची व सभासद यांची निवड करण्यांत येईल. संस्थापक अध्यक्ष कायम स्वरुपी अध्यक्ष राहील.

ब. सदर कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची व सभासद यांची निवड करण्यांसाठी मतदानाचा अधिकार फक्त आजिव सभासदांना राहील. निवडणुक्रीची पध्दत गुप्त मतदान पध्दतीने राहील.

७. **कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-**

**जूनेप्रमाणे :** कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना सात दिवस अगोदर पाठविण्याची जबाबदारी कार्यवाह यांची राहील. सदर सभेसाठी गणसंख्या कार्यकारी मंडळाच्या एकंदर सभासदांच्या दोन त्रत्यांश याप्रमाणे राहील. गणसंख्येअभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवसी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल. अशाप्रकारे स्थगित झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

नवीनप्रमाणे : कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना सात दिवस अगोदर पाठविण्याची जबाबदारी सचिव यांची राहील. सदर सभेसाठी गणसंख्या कार्यकारी मंडळाच्या एकंदर सभासदांच्या तीन पंचमांश याप्रमाणे राहील. गणसंख्येअभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवसी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल. अशाप्रकारे स्थगित झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. सभेची नोटीस सभासदांना हस्ते किंवा रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात येईल व पोहोच म्हणूस सही घेणेत येईल.

८. **कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :-**

**जूनेप्रमाणे :**

अ. कार्यकारी मंडळाची निवडणूक दर पाच वर्षांनी सर्वसाधारण सभेत होईल.

ब. कार्यकारी मंडळाच्या पदाधिकारी व सभासद यांची निवड करण्यासाठी मतदानाचा अधिकार फक्त आजीव व हितचिंतक सभासद यांना राहील.

क. निवडणूकीची पध्दत गुप्त किंवा हात वर करुन मतदान करण्याची राहील.

**नविनप्रमाणे :**

अ. कार्यकारी मंडळाची निवडणूक संस्थापक अध्यक्ष हा कायम स्वरुपी अध्यक्ष असलेने अध्यक्ष पद सोडून बाकीच्या सर्व पदांसाठी दर पाच वर्षांनी सर्वसाधारण सभेत होईल. उमेदवार म्हणून उभे राहण्याचा किंवा मतदान करण्याचा अधिकार फक्त आजीव सभासदांना राहील.

ब. निवडणूकीची पध्दत गुप्त मतदान पध्दती राहील.

९. **उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद (टक्केवारी) :-**

जूनेप्रमाणे :-

संस्थेचे [redacted]क आहे म्हणून संस्थेचे सर्व खर्च शैक्षणिक स्वरुपाचे आहेत. म्हणून १०० टक्के खर्च शैक्षणिक उद्दिष्टांसाठी करण्यात येईल.

नवीन प्रमाणे :-

संस्थेचे मूख्य उद्दिष्टये सामाजिक, वैद्यकिय, शैक्षणिक व इतर आहेत म्हणून संस्थेचे सर्व खर्च वरील उद्दिष्टांवर होतील.

ठाणे प्रदेश, ठाणे

1902/4 656/11 Ex. 1

Registered No. F/3668/Thane

# THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950
## SCHEDULE III
(Vide Rule 13(1)

Report of change that have occurred or are desired in the particulars recorded in the Registrar of the Public Trust u/s. 12 & 12A of Society Registration Act.

Name & Address of Public Trust : **NATIONAL EDUCATION SOCIETY**

Address : **At & Post Kudus, Tal. Wada, Dist. Thane**

Public Trust Registration No. : **F/3668/ Thane**

| Nature of Change | Reasons for the change | Remarks, if any |
|---|---|---|
| संस्थेच्या उद्देयशांत / घटना मध्ये मुददा क्रं. अ म्हणनू मुददा क्रं. १ बदल करण्यात आला आहे व मुददा क्रं. ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६ वाढ करण्यात आलेला आहे म्हणू ते रेकॉर्डवर नोंदवावे.<br><br>१. **विधानपत्राचे कलम ३ मधील उददेश क्रं. अ) बदल करण्याल आल आहे ते खालिल प्रमाणे आहे, ते नोंदण्यात यावे.**<br><br>१) संस्थेचे हेतु हे मुस्लिम समाजाच्या आर्थिक सामाजिक आणि शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करेल. त्यास्तव शाळा, कॉलेजेस उघडणे व तत्सम उपक्रम संस्था राबविणे, व्यावासायिक व वैद्यकिय संस्था उघडणे तसेच सामाजिक, सांस्कृतिक, ~~मानसिक~~ आणि नैसर्गिक उन्नतीसाठी कार्य करणे, त्यासाठी व्याखाने, सभा, संमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम, संस्कार शिबिरे व सण इत्यादी साजरे करणे. | मुस्लिम अल्पसंख्यांकांच्या हितास्तव काम करण्याकरीता व संस्थेच्या कामकाजाचा विस्तार करण्यासाठी बदल करण्यात आले आहे. | सोबत<br>१) दिनांक १८/०३/२०११ रोजीचे सभेचीनोटीस जोडलेले आहे.<br>२) दि. ०३/०४/२०११ रोजी झालेली सभाचे ठराव ची प्रत जोडलेले आहे.<br>३) दि. ०३/०४/२०११ रोजी जनरल बॉडी मिटींगचे मिनिट बुकची प्रत जोडले आहे.<br><br>०४) संस्थेचे नवीन विधान पत्रची प्रत<br>०५) संस्थेचे पुर्वीचे विधान पत्रचाचे प्रत<br>०६) संस्थेच्या विधानपत्राचे तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.<br><br>०७) शेडयुल १ चा उतारा<br>०८) सदस्यांचे संमतीपत्र<br>०९) सदस्यांचे हरकत नसल्याचे पत्र |

National Education Society ★ Kudus, Tal. Wada, Dist. Thane Regd No. F-3668

२. विधानपत्राचे कलम ३ मधील उददेश क्र. ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६ वाढ करण्याल आल आहे ते खालिल प्रमाणे आहे, ते नोंदण्यात यावे.

६) शिक्षण क्षेत्रामधील वेगवेगळया ठिकाणी बालवाडी, शिक्षण वर्ग, शिवण काम, बालवर्ग, उर्दु, मराठी, इंग्रजी माध्यमाची पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळा शुरू करणे व चालविणे तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये चालविणे, डी.एड., बी.एड, चे वर्ग चालविणे तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, वैद्यकीय शास्त्र, व्यवस्थापन शास्त्राच्या शिक्षणाचा विकास करणे, त्यासाठी पॉलिटेकनिक, अभियांत्रिकी, लॉ कॉलेज, वैद्यकीय आणि कृषि महाविद्यालय आणि रिसर्च सेंटर स्थापन करणे व चालविणे.

७) नव्या शिक्षण प्रणालीद्वारे विद्यार्थी व विद्यार्थिंनींना शिक्षण देणे.

८) जनहिताच्या दृष्टीने जनतेमध्ये सामाजिक, मानसिक व सांस्कृतिक विकास करणे.

९) महिलांसाठी शिक्षण सुविधा उपलब्ध करून समाजाचा विकास करणे.

१०) शहरी व ग्रामीण भागात राहण्यासाठी अंगणवडी, पौढ शिक्षण वर्ग, व्यायाम शाळा, वैद्यकीय सुविधा, धर्मदाय आरोग्य केंद्र, शिबीर इत्यादी स्थापन करून समाजाचा विकास कल्याण करणे.

११) बेरोजगार, अशिक्षीत जनतेला प्रेशिक्षिण देउन त्यांना मार्गदर्शन करणे.

National ...ucation Society ★ Reg. No. F-3663 310-95 Kudus, Tal. Wada, Dist. Thane

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १२) मुस्लिम अल्पसंख्यांक समाजातील लोकांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे त्यासाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणेत्र मागासलेल्या मुस्लिम समाजास एकत्रित आणून प्रबोधनाचे कार्य करणे. तसेच त्यांना शैक्षणिक महत्व पटवून देणे व त्याचा विकास करणे.<br><br>१३) मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व इतर सुविधा उपलब्ध करून देणे. त्यांना शिक्षणासाठी लागणारी योग्यती मदत मिळवून देणे.<br><br>१४) मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांची माहिती मिळवून देणे व त्या मिळवून देण्यासाठी योग्यतीमदत करणे.<br><br>१५) मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी मदत करणे. त्यासाठी उर्दु चे मशायरे, सैमीनार आयोजित करून मुस्लिम अल्पसंख्यांक समाजासाठी मिळणाऱ्या योजनांची माहिती मिळवून देणे.<br><br>१६) मुलांसाठी तसेच नोकरदार महिलांसाठी वस्तीगृह बांधणे, चालविणे तसेच त्यांची देखभाल करणे.<br><br>१७) हुशार व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करणे, उदा, वहया पुस्त, गणवेश इतर देणे.<br><br>१८) लोकांसाठी टायपिंग प्रशिक्षण वर्ग, कॉम्प्युटर प्रशिक्षण वर्ग चालविणे.<br><br>१९) कार्यक्षेत्रील गरीब व गरजू रूग्णांना वैद्यकीय सुविध उपलब्ध करून देण्यासाठी विविध आरोग्य विषयक शिबीर भरविणे, उदा, रक्तदान, नेत्रदान, विविध चिकित्सा शिबीरे, तसेच शक्य झाल्यस संस्थेतर्फे रूग्णवाहिका सुरू करणे, फिरत दवाखाना, | | |

Education Society ... Kudus, Tal. Wada, Dist. ...

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| प्रथमोपचार केंद्र शुरू करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करणे, असाध्य रोगांच्या उपचारांकरिता योग्यती वैद्यकीय व आर्थिक मदत करणे. | | |
| २०) या विभागातील नाटय, चित्रपट, शिक्षण, समाजसेवा प्रशासन, पत्रकारीता, व्यवस्थापा, उद्योग अथवा अन्य समाजोपयोगी क्षेत्रात नावजलेल्या व्यक्तिंना / संस्थाना पाचारण करून सभा, संमेलन, परिषदा, मेळावे, इत्यादी आयोजित करणे व समाजोन्नती साधणे. | | |
| २१) क्रिकेट, वॉलीबॉल, फुटबॉल, कबडडी, खोखो, अशा मैदानी खेळांच्या प्रसाससाठी क्रीडा स्पर्धा आयोजित करणे, तज्ञ प्रशिक्षिकांमार्फत खेळांचे प्रशिक्षण वर्ग सुरू करणे, देशी, विदेशी साहित्य उपलब्ध करून देणे, अत्याधुनिक व्यायामशाळा सुरू करणे. प्रविण्य मिळविणाऱ्या खेळाडुंचा गौरव करणे. | | |
| २२) महिलांचा आर्थिक विकास होण्यासाठी त्यांना लहान लहान महिला उद्योगांबाबत माहिती देणे व मागदर्शन करणे, उदा. पापड उद्योग, मसाले उद्योग, खडु, उद्बत्ती, शिलाईकाम, भरतकाम इ. बाबत माहिती प्रशिक्षण केंद्र चालविणे. | | |
| २३) समाजातील सर्व थरातील विद्यार्थ्यांकरीता वस्ती गृहे व ग्रंथालये, चालनालये स्थापन करून विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करून देणे. | | |
| २४) अनाथ, अपंग व गोरगरीबांच्या मुला, मुलींना शैक्षणिक मदत करणे, त्याचासाठी कल्याणकारी योजना राबविणे, त्यांचे पुनर्वसन करणे, तसेच त्यांचा सबंधी महाराष्ट्र शासन व भरत सरकारच्या नवनवीन योजना राबविणे, गोरगरीब विधवा, अपंग, अंध यांना शैक्षणिक, रोजगार विषयक मार्गदशन करणे. | | |

National Education Society, Regd No. F-... 310-93, Kudus, Tal. Wada, Dist. Thane

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २५) नैसर्गिक आपत्तिग्रस्तांना योग्य मदत करणे, त्यासाठी निधी उभारणे, निधी गोळा करणे, (महापूर, भुकंपश धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त) व पीडीत लोकांना सहाय्य करणे.<br><br>२६) स्वच्छता मोहिम राबविणे व लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देणे, तसेच खेडेगावातील वसाहतींना शासनाच्या विविध सुविधांचा लाभ मिळवून देणे तसेच शासकीय मदत घेउन योजना राबविणे. | | |

Date : 1/8/11

Signature & Address of the Reporting Trustees

I, **Mustafa Ahmed Memon**, residing at & Post Kudus, Tal. Wada, Dist. Thane, do solemnly affirm and say that whatever stated in this change report is true to the best of my information and belief.

Solemnly affirmed at Mumbai
Aforesaid 1s day of August 2011

Reporting Trustee

**Before Me**

01/08/11

NOTARY
Ashfaque M. Muqri
Thane (Maharashtra)
Regd. No.: 6331
GOVT. OF INDIA

**Ashfaque M. Muqri**
B.A., LL.B.
Advocate & Notary
GOVT. OF INDIA
Regd. No.: 6331
18, Waja Mohalla,
Bhiwandi-421302 Dist. Thane

National Education Society
Kudus, Tal. Wada, Dist. Thane
Regd. No. F-2168 3-10-93

Scanned with CamScanner

In Change Report No.656/2011
In the matter of :
"National Education Society",
At & Post. Kudus, Tal.Wada,
Dist.Thane.

**P.T.R. No.F-3668 (Thane).**

**- O R D E R -**
